# प्रकरण - आठ

## 'धनुर्धारी' च्या कादंबरीचे विशेष --

## प्रकरण आठवे

## " धनुर्धारीच्या कादंबरीचे विशेष "

### प्रस्तावना --

इ.स.१८७५ ते १९२० हा धनुर्धारी उर्फ रा.वि.टिकेकर यांचा कालखंड होय. या कालखंडामधील धनुर्धारी हे महत्वाचे लेखक आहेत. धनुर्धारीचे व्यक्तीमत्व बहुश्रुत होते.त्यांनी विपुल अशा प्रकारचे लेखन केले आहे. प्रकरण पहिल्यामध्ये पाहिल्याप्रमाणे त्यांनी ऐतिहासिक,धार्मिक,सामाजिक,आर्थिक अशा प्रकारचे लेखन केले आहे.तसेच त्यांच्या वाङ्.मयदृष्टया महत्वाच्या अशा दोन कादंब-या म्हणजे ' वाईकर भटजी ' आणि ' पिराजी पाटील ' होय.त्याचा विचार करता आपणास खालील विशेष जाणवतात.

धनुर्धारी यांचे साहित्य व त्यामधील विविधता पाहिल्यानंतर त्यांच्या व्यासंगी आणि बहुश्रुत व्यक्तीमत्वाची ओळख होते.धनुर्धारी हे हिंदूधर्माभिमानी होते. हिंदू संस्कृतीचा पगडा त्यांच्या मनावर होता.तत्कालिन सामाजिक स्थिती पाहून समाजामध्ये जागृती करण्याचे काम त्यांनी केले. सर्वसामान्य समाजाबद्दल त्यांना कळवळा होता.वस्तूस्थितीचे भान वेळोवेळी ते समाजाला देताना दिसतात.त्यासाठी त्यांनी आपल्या स्पष्टवक्तेपणाने समाजाला जागृत करीत होते.त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे अनेकांनी त्यांच्यावर टिकेची झोड उठविली पण त्याचा काही परिणाम त्यांच्यावर झाला नाही अशा धनुर्धारींनी आपली लेखणी समर्थपणे चालविली आणि ' वाईकर भटजी ' आणि ' पिराजी पाटील ' ह्या वस्तुस्थितिदर्शक वास्तववादी सामाजिक कादंब-या लिहिल्या.

धनुर्धारी यांच्या एकून साहित्यात कादंबरी वाङ्.मयाचा विचार करताना वाङ्.मयदृष्टया या दोन कादंब-या फार महत्वाच्या आहेत.असे असून देखील त्याचा फारसा विचार केला गेलेला नाही.धनुर्धारींची ' वाईकर भटजी ' ही कादंबरी मुंबई विद्यापीठ,नागपूर विद्यापीठ व श्री.ना.दा.ठा.महिला विद्यापीठ यामध्ये अभ्यासक्रमाला लावली गेली. त्यामुळे वाचकाचे व टिकाकाराचे लक्ष या

कादंबरीकडे गेले पण त्याच कालखंडामध्ये धनुर्धारींनी ' पिराजी पाटील ' ही ग्रामजीवन विषयक अधिक मौलिक व वस्तूनिष्ठ अशी कादंबरी लिहिली. पण या कादंबरीकडे वाङ्‌मयीन इतिहासकार व समिक्षकांचे मात्र पाहिजे तितके लक्ष गेले नाही असे सांगताना कुसुमावती देशपांडे म्हणतात " महाराष्ट्रातील ग्रामजीवन, इंग्रजी कालखंडातील अधिका-यांची बेपर्वाई, निसर्गाची अवकृपा, दुष्काळामुळे पसरलेली अवकळा याचे वर्णन धनुर्धारीनी फार जाणतेपणाने केले आहे. परंतु ' पिराजी पाटील ' पेक्षा ' वाईकर भटजी ' चीच महाराष्ट्राने अधिक आपुलकीने आठवण ठेवली. " [१] यावरुन आपणास म्हणता येईल की त्यावेळी ग्राम जीवनाची जाणिव पांढरपेशा समाजाला नव्हती त्यामुळे ही कादंबरी उपेक्षिली गेली.

याच कालखंडामध्ये हरिभाऊ आपटे यांच्या सारखा प्रतिभावंत कादंबरीकार निर्माण झाला. त्या कालखंडामध्ये निश्चित जीवन दृष्टीच्या आधारावर कादंबरी लिहिणारे ते एकमेव लोकप्रिय लेखक होते. त्यांच्या लोकप्रियतेमुळे आडोशाला पडलेले समकालिन कादंबरीकारांचा विचार करावा असे विचारवंताना किंवा समिक्षकांना वाटले नसावे. यादृष्टीकोनातून ही धनुर्धारीचे साहित्य उपेक्षिले गेले असे आपणास म्हणता येईल. तसेच तत्कालिन कालखंडामध्ये सामाजिक परिस्थिती ठासळली होती. तेव्हा समाजामध्ये चालणा-या ढोंगीपणावर व स्वार्थी, क्षुद्र वृत्तीवर सडेतोडपणे विचार धनुर्धारींनी मांडले ते विचार तत्कालिन समाजाला रुचले नसावे. धनुर्धारी हे सोलापूर-बार्शी या ग्रामीण परिसरात राहून लेखन करीत होते. पुण्या-मुंबईच्या साहित्यिक केन्द्रापासून दूर असल्यामुळे त्यांची उपेक्षा झाली असावी. त्याला त्यांच्या कादंब-या अपवाद राहिल्या नाहीत म्हणून ही त्यांच्या कादंब-या उपेक्षिल्या गेल्या असेच म्हणता येईल.

धनुर्धारीचे वाङ्‌मय पाहिले असता आपणास त्यामधील त्यांच्या अनुभवविश्वाचे वेगळेपण जाणवते. त्यांनी समाजाला कोणत्या रुपाने बोध देता येईल त्या रुपाने देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या साहित्यामध्ये विविधता जाणवते. धार्मिक, अर्थिक, वैचारिक, सामाजिक इ. विषयावर लेखन केले. तसेच वास्तववादी जीवनदर्शन देणा-या ' वाईकर भटजी ' व ' पिराजी पाटील ' ह्या वाङ्‌मयदृष्ट्या

महत्वाच्या अशा कादंब-या लिहिल्या आहेत.त्या काळातील वाड्.मयात नागरी मध्यमवर्गीय जीवनाचा आशय मांडला जात होता.वाईसारख्या मोठ्या शेह्यातील भिक्षुकी करुन हलाकीत जगणारा त्र्यंबकभट व ग्रामीण भागातील शेतकरी पाटील, गावची वाताहत इत्यादी वेगळ्या जीवनानुभवावर त्यांनी कादंबरी लेखन केले म्हणून त्यांच्या कादंबरीत अनुभव विश्वाचे वेगळेपण जाणवते.

धनुर्धारीच्या कादंबरीत कथानकाचा विचार करता असे दिसते की,त्यांनी तपशिलवार वर्णन करुन जीवनदर्शन दिले आहे. तर जीवन जगताना घालेल्या घटना प्रसंगातून सरळ निवेदन त्यांनी केले आहे. काही ठिकाणी कथानकामध्ये विस्कळीतपणा आला आहे.जीवनभाष्य केल्यामुळे व्यवहारातील काही गोष्टी आपणास सहज कळून जातात,त्यामुळे नायक व्यक्ती आपणास अनुभव सांगतो आहे असे वाटते.या दोन्ही कादंबरीत एका व्यक्तीच्या जीवनाची कहाणी सांगितली आहे.त्यातून तत्कालिन समाजदर्शन घडविले आहे.

या धनुर्धारीच्या कादंबरीचा विचार करताना एक विशेष जाणविते ते म्हणजे त्याचे व्यक्तिचित्रण होय. व्यक्तिचित्रण रेखाटताना धनुर्धारींनी बाह्य वर्णनापेक्षा त्या व्यक्तीच्या अंतरमनाचा वेध घेवून त्याची मानसिकता दाखवितात. त्यातून ते व्यक्तिचित्र उठावदार व जिवंत होते. सन १९४५ नंतरच्या नवकथेत व्यक्तीच्या मनोव्यापाराचे सुक्ष्मपणे चित्रण येऊ लागले पण त्यापूर्वी चाळीस वर्षे अगोदर धनुर्धारींनी आपल्या कादंब-यातून पात्राच्या मनातील विविध भावभावनांचे, विचार-प्रवृत्तीचे चित्रण केले आहे,त्यामुळे त्यांची पात्र-चित्रणे उठावदार व जिवंत झाली आहेत. येथेच धनुर्धारीच्या वाड्.मयाचे वेगळेपण आहे. तसेच कमी शब्दात त्याची मानसिकता दाखवून त्या व्यक्तीचे व्यक्तीमन ते दाखविताना दिसतात.त्यांच्या कथानकामध्ये व्यक्तिचित्रणाला महत्व आहे.व्यक्तिचित्रण जर आपण बाजूला काढले तर त्या कथेला अर्थ राहाणार नाही.म्हणजे त्यांचे कादंब-या या व्यक्तीमनावर आधारित आहेत.

धनुर्धारींच्या कादंबरीमध्ये संघर्ष आला आहे.काही प्रसंगानुरुप थोडा बहुत व्यक्ती-व्यक्तीमधील संघर्ष जाणवतो. तो काही प्रमाणात शारिरिक पातळीवर आहे तर काही प्रमाणात संघर्षांच्या पातळीवर आहे. येणा-या घटना प्रसंगाशी सामोरे

जाताना होणारी जी मानसिकता आहे ती दाखवून त्या व्यक्तीच्या मनाची तगमग किंवा संघर्ष दाखवितात. हा संघर्ष कादंबरीत जास्त प्रमाणात दिसतो.तसेच परिस्थिती आणि माणूस हा संघर्ष त्यांनी दाखविला आहे. जीवनात वाटेला येणारी विरोधी परिस्थिती किंवा नैसर्गिक अपत्ती याला तोंड देताना होणारी माणसाची जी ससेहोलपट आहे ती मात्र ते अतिशय सुंदर दाखवितात.ती व्यक्ती काही वेळा हातबल झालेली दाखवितात पण पुन्हा जोमाने जीवनाला सामोरे जातात.

वातावरणाच्यादृष्टीने त्यांनी कौटुंबिक वातावरण चांगल्याप्रकारे निर्माण केले आहे.त्यामुळे तत्कालिन समाजजीवन,संस्कृती,रुढीपरंपरा,ह्या गोष्टी आपणास सहज लक्षात येतात आणि कुटुंबातील व्यक्तीच्या आचार-विचार,वृत्ती-प्रवृत्ती, देवाण-घेवाण इत्यादि गोष्टींची कल्पना येते. कुटुंबाचे चित्र समोर उभे राहाते. धनुर्धारींचे वातावरण निर्मितीचे एक विशेष म्हणजे त्यांनी आपल्या 'पिराजी पाटील' या कादंबरीत प्रथम भौगोलिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याबाबत बापट आणि गोडबोले म्हणतात "आपल्याकडे 'पिराजी पाटील' सारख्या तुरळक कादंबऱ्यात भौगोलिक वातावरण निर्माण करण्याचा ग्रंथकारांनी प्रथम प्रयत्न केलेला दिसतो."[२] यावरुन ही धनुर्धारींचे वेगळेपण दिसते. त्यांनी दुष्काळाचे चित्रण करुन भौगोलिक परिस्थिती दाखविली आहे. सामाजिक वातावरण ही त्यांच्या कादंबरीत आलेले आहे पण धनुर्धारी जी वातावरण निर्मिती करतात ती त्या प्रसंग घटनांच्या तपशील वर्णनातून करतात.त्यामुळे उत्कट वातावरण जाणवत नाही. किंवा उत्कट वातावरण त्यांना निर्माण करता आले नाही.

धनुर्धारींच्या कादंबरीतील महत्वाचा घटक म्हणजे भाषाशैली होय. ती मात्र तत्कालिन समाज जीवनाप्रमाणे मध्यम वर्गीय ब्राह्मण समाजात बोलली जाणारी अशी आहे, ते संस्कृत चे व्यासंगी असल्याने त्यांच्या भाषेवर संस्कृतचा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांची भाषा संस्कृतप्रचूर अशी झाली आहे. काही पौराणिक संदर्भाच्या आधारे ते आपले अनुभव व्यक्त करताना दिसतात. अनुभवामध्ये अस्सलपणा आणण्यासाठी त्यांनी कादंबरीमध्ये संस्कृत सुभाषिते,मराठी वाक्प्रचार,म्हणीचा विपुल प्रमाणात वापर केला आहे पण ती त्या त्या प्रसंगानुसार एवढी चपखल

बसविले आहेत की त्यामुळे आपणास कंटाळवाणेपणा वाटत नाही. साधी व सरळ भाषा असल्याने ती आपल्या लक्षात राहतात.

' पिराजीपाटील ' या कादंबरीत ग्रामीण जीवन दर्शन असले तरी तिची भाषा ही प्रमाण भाषाच आहे पण ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी काही ठिकाणी मागे पाहिल्याप्रमाणे ग्रामीण बोलीचे ढंग असणारी भाषा वापरली आहे. प्रसंगानुरुप त्या त्या व्यक्तीचे मनोविश्लेषण ही करताना दिसतात. एकंदरीत साधी, सरळ, सोपी अशा भाषेतून तत्कालिन वास्तव जीवनदर्शन देण्याचा प्रयत्न केला आहे.

धनुर्धारींचे तत्कालिन दृष्टया वाङ्मयाचे विशेष म्हणजे त्यांच्या कादंबरीत आलेले ग्रामीण जीवनाचे चित्रण होय, ते त्यांनी अतिशय तन्मयतेने रेखाटले आहे. तत्कालिन खेड्या-पाड्यातील आणि नैसर्गिक आपत्तीने हतबल झालेली ग्रामीण समाज जीवन इतके चांगले रेखाटले आहे की त्याचे कोणतेही समकालिन कादंबरीकार ते रेखाटू शकले नाहीत. म्हणूनच आनंद यादव ' पिराजी पाटील ' ही पहिली ग्रामीण कादंबरी आहे [3] असे म्हणतात. त्यामध्ये शेतक-याविषयी, जनावराविषयीचे प्रेम ही आले आहे. गाव रहाटीचे दर्शनही त्यांच्या कादंबरीतून घडते.

धनुर्धारींच्या कादंबरीमध्ये सुक्ष्मनिरिक्षण आले आहे. त्या अनुषंगाने ते या दोन्ही कादंबरीत व्यक्तिचित्रणे मार्मिकपणे रेखाटले आहे. त्या व्यक्तीच्या लहान मोठया लकबी, सवय, मानसिक आंदोलने, त्यातून निर्माण होणारी मानसिक स्थिती इत्यादि तून ते व्यक्तिचित्रण गडद करतात. दुष्काळाचे दृश्य ही ते सुक्ष्मपणे टिपतात. त्यामुळे घटना प्रसंगात तपशीलवार वर्णने जाणवितात. स्वनुभवाने पटलेली गोष्ट ते समाजासमोर जाणिवपूर्वक ठेवताना दिसतात. तसेच बालविवाह, धर्मान्तर, दारिद्र्य, इत्यादि प्रश्नही ते हाताळताना दिसतात.

धनुर्धारींच्या कादंबरीचा विचार करताना गुणाबरोबर काही मर्यादाही जाणवतात. धनुर्धारी हे ग्रामीण जीवनापासून दूर असल्याने त्यांना हवी तशी ग्रामीण भाषा वापरता आलेली नाही. त्यांच्या कादंबरीमध्ये [illegible] व संघर्ष

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

जेवढया उत्कटतेने प्रगट व्हायला पाहिजे होते तेवढे झालेले दिसत नाही.त्यामुळे कादंबरीची परिणामकारकता कमी झाली आहे असे वाटते. ठिकठिकाणी त्यांनी माध्ये केली असल्याने कादंबरीच्या कथानकात एक प्रकारचा विस्कळीतपणा आला आहे असे सर्वसामान्य वाचकाला वाटल्याशिवाय राहात नाही.

असे जरी असले तरी धनुर्धारी यांच्या ह्या सुरुवातीच्या कादंबऱ्या आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. तत्कालिन कालखंडात कादंबरी तंत्राचा फारसा विकास झालेला नव्हता,त्यामुळे धनुर्धारींनी कादंबरीच्या कोणत्याही तंत्राला महत्वाचे असे स्थान दिले नाही.त्यांना आलेला जीवनानुभव प्रगटपणे समाजासमोर सरळ निवेदनाच्या रुपातून मांडला आहे,त्यातून समाजाला बोध देण्याचा प्रयत्न केला आहे. हे लक्षात घेतले म्हणजे त्यांच्या कादंबरीचे महत्व आपणास लक्षात येते.

इ.स.१८७५ ते १९२० या कालखंडामध्ये कादंबरी क्षेत्रात धनुर्धारी यांचे स्थान निश्चित वरच्या दर्जाचे आहे.त्यांच्या कादंबरीत पहिल्यांदा मनोविश्लेषण आलेले आहे.आजची नवकथा ह्याचे जे महत्वाचे वैशिष्ट मनोविश्लेषण आहे त्याचे मूळ आपणास धनुर्धारींच्या दोन्ही कादंबरीत दिसते.त्याचप्रमाणे ग्रामीण समाज जीवनाचे वास्तववादी चित्रण धनुर्धारींनी प्रथमच जाणिवपूर्वक केले आहे. म्हणून त्यांना पहिले ग्रामीण कादंबरीकार म्हणणे उचित ठरते.त्यांच्या इतर साहित्य वाङ्मयाकडे दृष्टी टाकली असता तत्कालिन दृष्टया त्याचे वाङ्मय किती महत्वाचे होते याची आपणास कल्पना येते.याच कालखंडात ' वाईकर भटजी ' आणि ' पिराजी पाटील ' ह्या दोन कादंबऱ्या लिहून त्यांनी कादंबरी वाङ्मयात आपले स्थान निश्चित केले आहे.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | देशपांडे कुसुमावती | 'मराठी कादंबरी पहिले शतक', १८५०-१९५०, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, आ.दुसरी, १९७५, पृ.३२४. |
| २ | बापट आणि गोडबोले | 'मराठी कादंबरी तंत्र व विकास', सु.आ.तिसरी, पुणे १९७३, पृ.१२५. |
| ३ | यादव, आनंद | 'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव,' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, आ.पहिली, १९८१, पृ.११७. |